# ब्रिक्स राष्ट्रांत शिवाजी विद्यापीठाचा झेंडा!

## संशोधनात मिळविले २१ वे स्थान: देशातही द्वितीय स्थानावर झेप : क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकींग जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्वाक्वेरेली सायमंड्स (क्यूएस) कडून नुकत्याच जाहीर केलेल्या क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकींगमध्ये शिवाजी विद्यापीठाचा झेंडा फडकला आहे. भारतासह ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका अशा पाच उदयोन्मुख राष्ट्रांमधील शैक्षणिक संस्थाचा समावेश असलेल्या रँकींगमध्ये शिवाजी विद्यापीठाने २१वे स्थान पटकावले. तर भारतातील शैक्षणिक संस्थांच्या रँकींगमध्ये द्वितीय स्थानी झेप घेतली असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.



कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'क्यूएस कडून नुकतीच क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकींग्ज जाहीर करण्यात आले. यामध्ये क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग २०२० मध्ये शिवाजी विद्यापीठाने भारतातील संस्थांच्या क्रमवारीत प्रति पेपर सायटेशन निकषामध्ये द्वितीय स्थान पटकावले आहे. प्रति संशोधक पेपर या निकषामध्ये ही विद्यापीठाने सतरावे स्थान मिळविले. तर ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ २१व्या क्रमांकावर आहे. तर प्रति संशोधक पेपरच्या निकषानुसार हा क्रमांक ४३ आहे.

क्यूएसकडून २००४ पासून हे रँकींग जाहीर केले जाते. गतवर्षीपासून क्यूएसकडून ब्रिक्स देशांसाठी मानांकने जाहीर केली जात आहेत. यामध्येही शिवाजी विद्यापीठाने आपला ठसा उमटवला आहे. क्यूएसकडून विविध ५१ निकषनिहाय क्रमवारी जाहीर केली जाते.

### शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

क्वाक्वेरेली सायमंड्सकडून २००४ पासून हे रँकींग जाहीर केले जात आहे. तेंव्हापासून यंदा प्रथमच शिवाजी विद्यापीठाने देशातंर्गत रँकींगमध्ये द्वितीय स्थानी झेप घेतली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून संशोधनामध्ये विद्यापीठ घेत असलेल्या परीश्रमाचे हे यश आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याचे, मत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

पान ७ पहा

# ब्रिक्स राष्ट्रांत शिवाजी विद्यापीठाचा झेंडा!

पान १ वरुन

जगभरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षणासाठी जगातील अग्रगण्य संस्था निवडण्यासाठी ही क्रमवारी उपयुक्त ठरते. क्रमवारी जाहीर करताना शैक्षणिक प्रतिष्ठा, नियोक्त्याची प्रतिष्ठा, प्रतिपेपर संशोधन उद्धरण एच-इंडेक्स या चार स्त्रोतांचा विचार केला जातो.

यापैकी पहिले दोन प्रत्येक विषयातील संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेची मूल्यांकन करण्यासाठी वापरले जातात. उर्वरीत दोन निर्देशक संबधित विषयातील प्रतिपेपर आणि एच-इंडेक्सच्या संशोधन उद्धरणांच्या आधारे संशोधन प्रभावाचे मूल्यांकन करतात. हे जगातील सर्वात व्यापक संशोधन उद्धरण डेटाबेस, एल्सव्हेयरच्या स्कोपस डेटाबेसमधुन प्राप्त केले जाते. क्यूएस युनिव्हर्सिटी रँकिग प्रत्येक देश व देशांच्या गटासाठी देखिल प्रकाशित केले जाते. या देशांच्या गटामध्ये आशिया, लॅटिन, अमेरिका, अरब देश, युरोप, मध्य आशिया आणि बिक्स राष्ट्रे यांचा समावेश असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी विलास पाटील उपस्थित होते.



कऱ्हाड येथे गुरुवारी कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस समवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कृष्णा इन्स्टिट्यूटचे अतिरिक्त संचालक (संशोधन) डी. के. अग्रवाल, समन्वयक के. डी. सोनवणे, डॉ. अतुल भोसले, कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलपती डॉ. सुरेश भोसले, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एम. व्ही. घोरपडे, एस. व्ही. काकडे उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ-कृष्णा इन्स्टिट्यूट करणार वैद्यकीय क्षेत्रात संशोधन

## करार; न्यूरोसायन्स, कर्करोगासह विविध घटकांवर एकत्रित अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी) यांच्यात गुरुवारी कऱ्हाड येथे सामंजस्य करार झाला. त्याअंतर्गत वैद्यकीय क्षेत्रातील न्यूरोसायन्स, कर्करोग, आदींबाबत संशोधन केले जाणार आहे.

या करारामुळे विद्यापीठातील एम. एससी. इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता होईल. कृष्णा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांना बायोइन्फॉर्मेटिक्स, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, फार्मास्युटिकल मायक्रोबायॉलॉजी, बायोकेमिस्ट्री, पश्चिम घाटातील जैवविविधता, सामाजिक शास्त्रांमधीलही वैद्यकीय क्षेत्राला पूरक अशा क्षेत्रांबाबत अभ्यास करता येणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

### विविध संयुक्त उपक्रम

फॅकल्टी-स्टुडंट्स एक्स्चेंज, विविध संयुक्त शैक्षणिक व संशोधकीय उपक्रम, संयुक्त प्रकाशने, डाटा एक्स्चेंज, ग्रंथालयीन सहकार्य अशा अनेक दिशांनी ही सहकार्यवृद्धी होणार आहे.

विद्यापीठासमवेत होत असलेला हा सामंजस्य करार दूरगामी महत्त्वाचा आहे. भविष्यात या माध्यमातून दोन्ही संस्थांच्या दरम्यान सहकार्याची आणखी नवनवीन क्षेत्रे उघडली जातील आणि हे सहकार्य अखंडित राहील, असे कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांनी सांगितले. या करारावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. एस. व्ही. काकडे यांनी स्वागत केले. डॉ. डी. के. अग्रवाल यांनी आभार मानले. यावेळी अलाईड सायन्सेस विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. सी. काळे, डी. ए. माने उपस्थित होते.

'ब्रिक्स' राष्ट्रांत २१ व्या स्थानी : क्रमवारीत आघाडी

# शिवाजी विद्यापीठ 'क्यूएस रँकिंग'मध्ये देशात दुसरे

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने संशोधनातील 'क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२०'मध्ये भारतातील संस्थांच्या क्रमवारीमध्ये 'प्रतिपेपर सायटेशन' निकषामध्ये द्वितीय स्थान पटकावले आहे. ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत २१ वा क्रमांक मिळविला आहे. त्यामुळे विद्यापीठाची संशोधनविषयक निर्देशांक उत्कृष्टता अधिक ठळक झाली आहे. 'आयआयटी'सारख्या संशोधनाला समर्पित संस्थांच्या मांदियाळीत विद्यापीठाने मिळविलेले हे स्थान गौरवास्पद आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

## क्रमवारी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त

जगभरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षणासाठी जगातील अग्रगण्य संस्था निवडण्यासाठी ही क्रमवारी उपयुक्त ठरते. 'ब्रिक्स' राष्ट्रांमध्ये ब्राझिल, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. क्यूएसकडून सन २००४ पासून हे रँकिंग जाहीर केले जात आहे. गेल्यावर्षी ब्रिक्स देशांसाठी मानांकने जाहीर करण्यास सुरुवात झाली. त्यात विद्यापीठाने स्थान मिळविले होते, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.



## सायटेशन म्हणजे काय?

संशोधकांचा संशोधन पेपर अन्य संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी त्यांच्या पेपरसाठी संदर्भ म्हणून किती वेळा वापरला. त्याच्या मोजणीला सायटेशन म्हटले जाते

क्वाक्वेरेली सायमंड्स (क्यूएस) द्वारा क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग्ज जाहीर झाले आहे. त्यात शिवाजी विद्यापीठ देशात 'प्रतिसंशोधक पेपर' या निकषांतही १७ व्या स्थानी, तर ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत ४३ व्या क्रमांकावर आहे. प्रतिपेपर सायटेशन निकषात मुंबईतील आयसीटी देशात प्रथम क्रमांकावर आहे. 'क्यूएस'कडून विविध ५१ निकषनिहाय क्रमवारी जाहीर केली. त्यासाठी शैक्षणिक प्रतिष्ठा, नियोक्त्याची प्रतिष्ठा, प्रतिपेपर संशोधन उद्धरण (सायटेशन), एच-इंडेक्स या चार स्रोतांचा विचार केला जातो.

यापैकी पहिले दोन निर्देशक प्रत्येक विषयातील संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जातात. उर्वरित दोन निर्देशक संबंधित विषयातील प्रतिपेपर आणि एच-इंडेक्सच्या संशोधन उद्धरणांच्या आधारे संशोधन प्रभावाचे मूल्यांकन करतात. हे जगातील सर्वांत व्यापक संशोधन उद्धरण डेटाबेस, एल्सव्हेअरच्या स्कोपस डेटाबेसमधून प्राप्त केले जाते. क्यूएसं युनिव्हर्सिटी रँकिंग प्रत्येक देश व देशांच्या गटासाठीही प्रकाशित केले जाते, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, सूक्ष्मजीवशास्त्राचे प्रा. डॉ. के. डी. सोनवणे उपस्थित होते.

'राजर्षी शाहू अभ्यास' केंद्राची स्थापना : संशोधन होणार

# शिवाजी विद्यापीठ करणार संस्कृती संवर्धन

लोकमत न्यूज नेटवर्क,

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने राजर्षी शाहू लोकविद्या, लोकसंस्कृती अभ्यासकेंद्राची स्थापना केली. त्याच्या माध्यमातून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील लोकविद्या, संस्कृतीचे संवर्धन, संकलन आणि जतन करण्याचे काम विद्यापीठ करणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी दिली.

या तिन्ही जिल्ह्यांतील विविध बोली, लोकसाहित्याचे विविध प्रकार, लोकसंस्कृती, लोककथा, गीते, नाट्य, नृत्ये, आदी विविध प्रकार पाहायला मिळतात. त्यांचा अभ्यास व्हावा. परंपरागत ज्ञानभांडाराचे संचित संवर्धित, संकलित करता यावे. लोककलाकारांच्या कलागुणांना संधी देता यावी. त्यांचे ज्ञान, कला-कौशल्ये नव्या पिढीसमोर आणावीत. जुन्या-नव्या ज्ञानाचा समन्वय साधावा यासाठी हे केंद्र स्थापन केले आहे. त्याद्वारे आंतरविद्याशाखीय अभ्यास, संशोधन केले जाणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या अभ्यास केंद्राच्या माध्यमातून मौखिक परंपरेतील ज्ञानसंचिताबरोबर लोककथा, लोकगीते, विधीगीते, ओव्या, आदी प्रकाशित केली जातील. हे ज्ञान पुढील पिढीकडे हस्तांतरित करण्याबाबत कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातील. पारंपरिक लोककलांचे दृक्‌श्राव्य मुद्रण करून ते जतन केले जातील. लोककलाकारांची वाद्ये, इतर साहित्याचे संग्रहालय तयार केले जाईल. बोलीभाषांच्या अभ्यासाचे प्रकल्प पूर्ण केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संलग्नित २७६ महाविद्यालयांची मदत

विद्यापीठ संलग्नित २७६ महाविद्यालयांना त्यांच्या परिसरातील लोककला, संस्कृतीची माहिती संकलनाची जबाबदारी दिली जाणार आहे. ही माहिती त्यांच्या डिजिटल स्वरूपात घेऊन ती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येणार आहे. तंजावरसमवेतही विद्यापीठ सामंजस्य करार केला जाणार असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले.



# शिवाजी विद्यापीठाची परीक्षा शुल्कवाढ स्थगित

## कोरोनामुळे निर्णय : विद्यार्थी, पालकांना दिलासा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांची परीक्षा शुल्कवाढ स्थगित केली आहे. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार गुरुवारी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालकांना दिलासा मिळणार आहे. यापूर्वी विद्यापीठाने प्रवेश आणि शैक्षणिक शुल्कवाढीसही स्थगिती दिली आहे..

विद्यापीठ उन्हाळी आणि हिवाळी या दोन्ही सत्रांत एकूण १४०० परीक्षा घेते. (पान ६ वर)

## 'बॅकलॉग' विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू

■ ऑक्टोबरमध्ये झालेल्या अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षेला गैरहजर राहिलेल्या विविध अभ्यास-क्रमांच्या पदवी आणि पदव्युत्तर बॅकलॉग विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा गुरुवारपासून सुरू झाली.

■ पहिल्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी पाच या वेळेतील चार सत्रांमधील परीक्षेसाठी ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी २९८ जणांनी परीक्षा दिली, तर १८९ जण गैरहजर होते.

# विद्यापीठाची परीक्षा शुल्कवाढ स्थगित

(पान १ वरून) त्यासाठी सुमारे अडीच लाख परीक्षार्थी असतात. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये विद्यापीठाकडून मूळ परीक्षा शुल्कावर पाच टक्के शुल्कवाढ केली जाते. मात्र, कोरोनामुळे पालकांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी वाढीव शुल्क भरू शकणार नाहीत. त्याचा विचार करून विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी परीक्षा शुल्कवाढ एक वर्षासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

# सुप्रिया कुसाळेच्या सेंद्रिय खत संशोधनास राष्ट्रीय पारितोषिक

■ लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली (एआययू) यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय संशोधन स्पर्धा 'अन्वेषण'मध्ये शिवाजी विद्यापीठातर्फे सहभागी झालेल्या संशोधक विद्यार्थिनी सुप्रिया प्रकाश कुसाळे (रा. वळीवडे) हिने संशोधित केलेल्या सेंद्रिय खतास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ती राजाराम कॉलेजची विद्यार्थिनी आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या उपस्थितीत शिवाजी विद्यापीठात तिला गौरविण्यात आले. भारतातून आलेल्या विविध व नावीन्यपूर्ण प्रवेशिकांमधून सुप्रिया कुसाळे हिच्या 'इकोफ्रेंडली अँड कॉस्ट इफेक्टिव्ह प्रॉडक्शन ऑफ फायटेज प्रोड्युसिंग बायोईनॉक्लंट अँड इस्ट इफिकसी इन फिल्ड' या संशोधनास वाखाणण्यात आले. पर्यावरणपूर्वक, किफायती फायटेज तयार करण्याची क्षमता असलेले जैविक खत तिने तयार केले आहे. गेली तीन वर्षे सुरू असलेल्या या संशोधनांतर्गत खतामुळे ऊस, मका, मिरची, आले, हळद, ज्वारी व भात या पिकांची गुणवत्ता वाढण्यासोबतच मातीची सुपीकताही वाढल्याचे दिसून आले.

मुंबई येथे झालेल्या आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धेत तिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. राज्यस्तरीय स्पर्धेतही या संशोधनास प्रथम क्रमांक मिळाला.

# शिवाजी विद्यापीठ-कृष्णा इन्स्टिट्यूटमध्ये सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कराड येथील कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी) समवेत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराचा लाभ शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह संशोधकांना मोठ्या प्रमाणात होईल, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी कराड येथे व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ आणि कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी यांच्या दरम्यान गुरुवारी कराड येथे सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलपती डॉ. सुरेश भोसले, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अतुल भोसले उपस्थित होते.



कोल्हापूर : कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. या प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत डॉ. सुरेश भोसले, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एम. व्ही. घोरपडे आणि डॉ. एस. व्ही. काकडे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक शिक्षक व विद्यार्थी यांच्यादरम्यान संशोधकीय सहकार्य निर्माण होईल. कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलपती डॉ. भोसले म्हणाले, या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांना संशोधनात्मक दृष्टीने मोठा लाभ होणार आहे. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी डॉ. डी. के. अग्रवाल, अधिष्ठाता डॉ. एस. सी. काळे, डी. ए. माने, समन्वयक डॉ. के. डी. सोनवणे उपस्थित होते. सुरुवातीला डॉ. एस. व्ही. काकडे यांनी स्वागत केले. डॉ. डी. के. अग्रवाल यांनी आभार मानले.

# संशोधनात शिवाजी विद्यापीठ देशात दुसरे

## क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्वाक्वेरेली सायमंड्स (क्यूएस) द्वारा नुकत्याच जाहीर झालेल्या 'क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२०'मध्ये शिवाजी विद्यापीठाने भारतातील क्रमवारीत 'प्रति पेपर सायटेशन' निकषामध्ये द्वितीय स्थान पटकावले आहे. 'प्रति संशोधक पेपर' या निकषातही विद्यापीठ देशात सतरावे आल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, क्यूएस ब्रिक्स रँकिंगमध्ये 'प्रती पेपर सायटेशन' या निकषानुसार ब्रिक्स देशांतील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ २१ व्या क्रमांकावर आहे, तर 'प्रति संशोधक पेपर'च्या निकषानुसार हा क्रमांक ४३ वा आहे. ब्रिक्स राष्ट्रांमध्ये ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच उदयोन्मुख राष्ट्रांचा समावेश आहे. क्वाक्वेरी सायमंड्स (क्यूएस) द्वारा सन २००४ पासून क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग जाहीर केली जातात. गतवर्षीपासून क्यूएसने ब्रिक्स देशांसाठी मानांकने जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्येही शिवाजी विद्यापीठाला स्थान लाभले होते.



यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे, सूक्ष्मजीवशास्त्राचे प्रा. डॉ. के. डी. सोनवणे उपस्थित होते.

### विद्यापीठात लोकविद्या-लोकसंस्कृती केंद्र

विद्यापीठाच्या परिक्षेत्रात येणाऱ्या कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील कलाकौशल्ये हस्तांतरित करणे, त्यांची ख्याती जगभर पोहोचविण्यासाठी राजर्षी शाहू लोकविद्या व लोकसंस्कृती अभ्यास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. नव्या पिढीच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, तसेच व्यावसायिक ज्ञान, लोककला अभ्यास व संवर्धन हा त्यामागचा उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेससोबत विद्यापीठाचा करार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व कराड येथील कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस यांच्यात आज सामंजस्य करार झाला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व कृष्णा इन्स्टिट्यूटचे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. विद्यापीठातील एम. एस्सी. इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता होऊ शकेल. न्यूरो सायन्स, कर्करोग संशोधन याविषयी संशोधन करता येईल. कृष्णा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांना बायोइन्फॉर्मेटिक्स, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, फार्मास्युटिकल, मायक्रोबायोलॉजी, बायोकेमिस्ट्री, पश्चिम घाटातील जैवविविधता आदीचा अभ्यास करणे शक्य होईल.



कोल्हापूर : राजाराम महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची पीएच. डी. विद्यार्थिनी सुप्रिया प्रकाश कुसाळे हिचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना प्राचार्य अण्णासाहेब खेमनर. शेजारी प्रा. डॉ. यास्मिन आतार.

# नावीन्यपूर्ण सेंद्रिय खताच्या संशोधनास राष्ट्रीय पारितोषिक

## राजाराम महाविद्यालयातील कुसाळे हिचे यश

**कोल्हापूर, ता. १७ :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजतर्फे आयोजित राष्ट्रीय संशोधन 'अन्वेषण' स्पर्धेत राजाराम महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची पीएच.डी. विद्यार्थिनी सुप्रिया प्रकाश कुसाळे (वळीवडे) हिने संशोधन केलेल्या सेंद्रिय खतास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. भारतातून आलेल्या विविध व नावीन्यपूर्ण प्रवेशिकांमधून तिच्या 'इकोफ्रेंडली अँड कॉस्ट एफ्फेक्टिव्ह प्रॉडक्शन ऑफ फायटेज प्रोड्युसिंग बायोईनॉक्लन्ट अँड इस्ट इफिकसी इन फील्ड' संशोधनास वाखाणण्यात आले. तिने पर्यावरणपूर्वक, किफायती फायटेज तयार करण्याची क्षमता असलेले जैविक खत तयार केले आहे. तीन वर्षे सुरु असलेल्या संशोधनात या खतामुळे ऊस, मका, मिरची, आले, हळद, ज्वारी, व भात या पिकांची गुणवत्ता वाढण्यासोबतच मातीची सुपीकता वाढल्याचे दिसून आले.

आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धा 'आविष्कार'मध्ये तिच्या संशोधनास प्रथम क्रमांक मिळाला. राज्यस्तरीय स्पर्धेतही या संशोधनास प्रथम क्रमांक मिळाला. भोपाळ येथे मार्च महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत ती महाराष्ट्राचे प्राधिनिधित्व करणार होती. तिला राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमनर, सुक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रमुख व मार्गदर्शक डॉ. यास्मिन आतार, प्रा. शोभना भोसले व प्रा. शहनाज फारुकी यांचे मार्गदर्शन, तर शोभा कुसाळे, प्रकाश कुसाळे, प्रतीक कुसाळे व डॉ. गणपती सूर्यवंशी यांचे सहकार्य मिळाले.

# लोकसंस्कृती अभ्यास केंद्र स्थापणार : डॉ. शिर्के

## लोककलांचे ऑडिओ-व्हिडिओ मागवणार

**कोल्हापूर, ता.१७ :** शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू लोकविद्या व लोकसंस्कृती अभ्यास केंद्र स्थापन करण्यात येत असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज दिली. केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक महाविद्यालयातील प्राचार्यांकडून त्या त्या क्षेत्रातील लोककलांचे ऑडिओ-व्हिडिओ मागविले जाणार असून, ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कोल्हापूर सांगली व सातारा जिल्ह्यात शेतकरी, बलुतेदार, अलुतेदार, पारंपरिक व्यावसायिक, फिरस्ते व भटक्या लोकांनी सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे.

या समाजरचनेचे परंपरागत ज्ञान संचित, कला कौशल्य, व्यवसाय ज्ञान, लोककला यांचा अभ्यास, संवर्धन व हस्तांतरण करण्याच्या उद्देशाने अभ्यास केंद्र स्थापन केले जात आहे. त्यात विविध बोली, लोकसाहित्याचे विविध प्रकार, लोकगीते, लोककथा, लोकनाट्य, म्हणी, उखाणे, वाकप्रचार, पारंपरिक कला, विविध रूढी, परंपरा यातून आकाराला आलेल्या लोकसंस्कृतीचा अभ्यास केला जाईल.

### केंद्राची उद्दिष्टे...

- मौखिक परंपरेतील ज्ञान, साहित्य संकलन, संपादन व प्रकाशन
- जन समुदायांच्या ललित कलांचा अभ्यास
- विविध लोककला प्रकारांचे संकलन, संवर्धन व जतन
- सर्व लोककला प्रकारांचे विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण
- विविध समूहाचा सांस्कृतिक दृष्टिकोनातून अभ्यास
- पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक ज्ञानाशी संबंध जोडणे
- प्रस्थापित पारंपरिक हस्तकला कौशल्यातून साकारलेल्या वस्तूंचे प्रदर्शन
- पारंपरिक कलाकौशल्ये नवीन पिढीकडे हस्तांतरित करण्यासाठी कार्यशाळा

# क्यूएस रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ दुसरे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : क्वाक्वेरेली सायमंडसतर्फे (क्यूएस) जाहीर झालेल्या क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाने देशातील संस्थांच्या क्रमवारीत प्रति पेपर सायटेशन निकषात द्वितीय स्थान पटकावले आहे. प्रति संशोधक सायटेशनमध्ये ते देशात सतरावे असून, क्यूएस ब्रिक्स रँकिंगमध्ये प्रति पेपर सायटेशन निकषात ब्रिक्स देशातील शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत २१ व्या क्रमांकावर आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. प्रति संशोधक पेपरच्या निकषात हा क्रमांक ४३ वा असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. शिर्के म्हणाले, ''ब्रिक्स राष्ट्रांत ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिकेचा समावेश आहे. क्वाक्वेरेली सायमंडसतर्फे २००४ पासून क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग जाहीर केले जाते. गेल्यावर्षीपासून क्यूएसने ब्रिक्स देशांसाठी मानांकने जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. त्यात विद्यापीठाला स्थान मिळाले होते. यंदाही विद्यापीठाचा संशोधन विषयक निर्देशांक उत्कृष्ट असल्याचे स्पष्ट झाले आहे. आयआयटीसारख्या संशोधनाला समर्पित संस्थांच्या मांदियाळीत विद्यापीठाने प्राप्त केलेले स्थान गौरवास्पद आहे.''

ते म्हणाले, 'क्यूएसकडून विविध ५१ निकषनिहाय क्रमवारी जाहीर केली जाते. शैक्षणिक प्रतिष्ठा, नियोक्त्याची प्रतिष्ठा, सायटेशन, एच इंडेक्स स्त्रोतांचा विचार केला जातो. यापैकी पहिले दोन प्रत्येक विषयातील संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जातात. उर्वरित दोन निर्देशक संबंधित विषयातील प्रति पेपर व एच इंडेक्सच्या संशोधन उद्धरणांच्या आधारे संशोधन प्रभावाचे मुल्यांकन करतात. क्यूएस युनिव्हर्सिटी रँकिंग प्रत्येक देश व देशांच्या गटासाठी देखील प्रकाशित केले जाते.' पत्रकार परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखा अधिकारी विलास पाटील उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठ संशोधनात 'भारी'

## क्यूएस ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग : देशात दुसरा तर ब्रिक्स राष्ट्रात २१ वा क्रमांक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्वाक्वेरेली सायमंडस (क्यूएस) वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग जाहीर केले असून त्यात ब्रिक्स युनिव्हर्सिटी रँकिंग २०२० मध्ये शिवाजी विद्यापीठाने देशात दुसरा क्रमांक तर ब्रिक्स राष्ट्रात २१ वा क्रमांक पटकावला असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठासाठी ही कौतुकास्पद बाब असल्याचे सांगून डॉ. शिर्के म्हणाले, संशोधकांची संशोधने ही स्थानिक, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध केली जातात. नव्याने जे संशोधन करत असतात त्यांना या विषयांचा लाभ होतो.

रँकिंग जाहीर करत असताना शैक्षणिक प्रतिष्ठा, प्रति पेपर संशोधन, नियोक्त्याची प्रतिष्ठा या निकषांचा वापर केला जातो. यातील पहिले दोन निकष हे प्रत्येक विषयातील संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जातात. उर्वरित दोन निकष संबंधित विषयातील प्रति पेपर आणि एच इंडेक्सच्या संशोधन उद्धरणांच्या आधारे संशोधन प्रभावाचे मूल्यांकन करतात. हे जगातील सर्वात व्यापक संशोधन उद्धरण डाटाबेस, एल्सव्हेरयच्या स्कोप्स डेटाबेसमधून प्राप्त केले जाते. ब्रिक्स देशांच्या शैक्षणिक संस्थांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठ २१ व्या तर प्रति संशोधक पेपरच्या निकषानुसार ४३ व्या क्रमांकावर येत असल्याची माहिती डॉ. शिर्के यांनी दिली. या पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विलास पाटील, परीक्षा नियंत्रक गजानन पळसे उपस्थित होते.



### अनेक संशोधने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध

विद्यापीठ पातळीवरील अनेक संशोधने ही अंतरराष्ट्रीय पातळीवरील नियकालिकांमध्ये प्रसिद्ध झाली आहेत. नव्याने संशोधन करणारे संशोधक या संशोधनाचा संदर्भ म्हणून वापर करतात. ब्रिक्स राष्ट्रांमध्ये भारत, ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण अफ्रिका या पाच देशांचा समावेश आहे.



# वाढीव परीक्षा शुल्कला स्थगिती

शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठीचे वाढीव शुल्क यावर्षी कोरोनामुळे स्थगित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. दरवर्षी या शुल्कामध्ये पाच टक्के वाढ होत असते. मार्च-एप्रिल २०१९ मध्ये परीक्षांसाठी जे शुल्क होते तेच शुल्क आता होणाऱ्या परीक्षांसाठी घेतले जाणार आहे. कोव्हिडमुळे ही फी वाढ करू नये, असा ठराव अधिकार मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानंतर २०२०-२१ सालासाठी ही परीक्षा वाढ रद्द करण्यात आल्याचे प्रभारी परीक्षा नियंत्रक गजानन पळसे यांनी सांगितले.

# कंत्राटी प्राध्यापकांच्या नेमणुका त्वरित करा; प्राचार्य संघटनेची मागणी

कंत्राटी प्राध्यापकांना नियमित करा, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ प्राचार्य संघटनेच्या शिष्टमंडळाने विभागीय सहसंचालक यांच्याकडे केली आहे. चर्चेदरम्यान संघटनेने कंत्राटी प्राध्यापकांच्या नेमणुकीबाबत वारंवार मागणी करूनही त्यांची पूर्तता झाली नसल्याने प्राध्यापकांमध्ये नाराजी असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. तसेच प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांची वेतननिश्चिती प्रकरणे विनाकारण कार्यालयाने प्रलंबित ठेवल्याचे सांगितले. याबाबत विभागीय सहसंचालकांनी लवकरच कार्यवाही करू असे सांगितले. यावेळी शिष्टमंडळात डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. आर. डी. मोरे, डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. प्रवीण चौगुले, डॉ.एस.एस.गवळी यांचा समावेश होता.

# शिवाजी विद्यापीठ-कृष्णा इन्स्टिटयूटमध्ये करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कराड येथील कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस समवेत करण्यात आलेल्या सामंजस्य कराराचा लाभ शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह संशोधकांना मोठ्या प्रमाणात होईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. कराड येथे झालेल्या सामंजस्य कराराची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, या सामंजस्य करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक शिक्षक व विद्यार्थी यांच्यादरम्यान संशोधकीय सहकार्य निर्माण होऊ शकणार आहे. विशेषतः शिवाजी विद्यापीठातील एम.एस्सी. इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता होऊ शकेल. यामध्ये न्युरोसायन्स, कर्करोग संशोधन इत्यादीविषयक संशोधन करता येईल. कृष्णा इन्स्टिटयूटच्या विद्यार्थ्यांना बायोइन्फॉर्मेटिक्स, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, फार्मास्युटिकल मायक्रोबायॉलॉजी, बायोकेमिस्ट्री, पश्चिम घाटातील जैवविविधता तसेच सामाजिक शास्त्रांमधीलही वैद्यकीय क्षेत्राला पूरक अशा क्षेत्रांबाबत अभ्यास करणे शक्य होईल. संयुक्त शैक्षणिक व संशोधकीय उपक्रम, संयुक्त प्रकाशने, डाटा एक्स्चेंज, ग्रंथालयीन सहकार्य यासाठी या कराराचा लाभ होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ आणि कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस डीम्ड टू बी युनिव्हर्सिटी यांच्या दरम्यान सामंजस्य करार प्रसंगी कृष्णा इन्स्टिटयूटचे कुलपती डॉ. सुरेश भोसले, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, डॉ. अतुल भोसले उपस्थित होते.

# राष्ट्रीय संशोधन स्पर्धेत सुप्रिया कुसाळे द्वितीय

## सेंद्रिय खतनिर्मितीबाबत विशेष संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली (एआययू) यांच्यातर्फे आयोजित राष्ट्रीय संशोधन स्पर्धा 'अन्वेषण'मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी सुप्रिया प्रकाश कुसाळे (रा. वळीवडे, ता. करवीर) यांच्या सेंद्रिय खतास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

देशभरातील प्रवेशिकांमधून राजाराम महाविद्यालयात संशोधन करीत असलेल्या सुप्रिया कुसाळे यांच्या 'इकोफ्रेंडली अँड कॉस्ट एफेक्टिव्ह प्रॉडक्शन ऑफ फायटेज प्रोड्युसिंग बायोईनॉक्लन्ट अँड इस्ट इफिक्सी इन फिल्ड' या संशोधनास गौरवण्यात आले. त्यांनी पर्यावरणपूर्वक, किफायती फायटेज तयार करण्याची क्षमता असलेले जैविक खत तयार केले आहे. गेली तीन वर्षे सुरू असलेल्या या संशोधनांतर्गत या खतामुळे ऊस, मका, मिरची, आले, हळद, ज्वारी व भात या पिकांची गुणवत्ता वाढण्यासोबतच मातीची सुपीकताही वाढल्याचे दिसून आले.

गेल्या जानेवारीत मुंबई येथे झालेल्या आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धा 'आविष्कार'मध्ये सुप्रिया शिवाजी विद्यापीठाकडून सहभागी झाल्या. त्यांच्या संशोधनास तेथे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. फेब्रुवारीत मुंबई येथेच झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतही या संशोधनास प्रथम क्रमांक मिळाला. भोपाळ येथे मार्चमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत त्या महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार होत्या; परंतु कोरोनामुळे स्पर्धा डिसेंबरमध्ये ऑनलाईन झाली. १६ डिसेंबर रोजी अंतिम निकाल जाहीर करण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी या यशाबद्दल सुप्रिया यांचे अभिनंदन करत भविष्यातील संशोधनासाठी योग्य ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या संशोधनासाठी तिला डॉ. पंकज पवार, डॉ. शशीभूषण महाडिक, राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमनर, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रमुख व मार्गदर्शक डॉ. यास्मिन आत्तार याचे सहकार्य मिळाले.